आरोग्य विभाग
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
दि.०१/०७/२०२६

**विषय - श्री साईबाबा नविन दर्शन कॉम्पलेक्स व परिसर यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व गार्डनिंग कामाच्या ई-निविदेबाबत शंका / प्रश्न (Pre - Bid Queries) बाबत खुलासा**

1. salvagegroup sales यांचा दि.३०/०६/२०२६ रोजीचे ई-मेल व्दारे प्राप्त झालेले मुद्दे व त्यावरील खुलासा खालीलप्रमाणे

| अ.नं. | पान नं. व अट/नियम क्र. | निविदा दस्तऐवजातील मूळ अट / तरतूद | निविदाधारकाकडून स्पष्टीकरण / विनंती | खुलासा |
|---|---|---|---|---|
| ०१ | पा.नं. ०८ (अट क्र. - ११) | ''निविदाधारकाची मागील ०३ आर्थिक वर्षातील (सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५) सरासरी वार्षिक उलाढाल किमान ०५ कोटी असणे आवश्यक आहे. व ती हाऊसकिपींग कामाशी संबंधीत असावी.'' | जर एखादया कंपनीचे चार्टर्ड अकाऊंटन्ट (CA) प्रमाणपत्र एकत्रित फॅसिलीटी मॅनेजमेंट उलाढाल दर्शवत असेल तर ते ग्राह्य धरण्यात यावे, हि विनंती. | **ई-निविदेतील अट क्र.११ नुसार हाऊसकिपींग कामाची उलाढाल ग्राह्य धरली जाईल.** |
| ०२ | पा.नं. ०८ (अट क्र. - ०४) | "MSME अंतर्गत निविदा फि व बयाना रक्कम (EMD) न भरण्याचे सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदा धारकांनी ती भरणे अनिवार्य आहे." | केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या खरेदी धोरणानुसार, पात्र MSME/ NSIC नोंदणीकृत कंपन्यांना बयाना रक्कम (EMD) आणि निविदा शुल्कातून सवलत मिळण्यास मान्यता द्यावी. | **ई-निविदेतील अट क्र.०३ व ०४ नुसार ई-निविदा मान्य राहील.** |
| ०३ | पा.नं. १४ व १६ (अट क्र. - ५४(इ) व ६६) | "फेस रीडिंग मशीनवर नोंदणी करून दैनिक १२६ मनुष्यबळ पुरवणे बंधनकारक आहे. कर्मचारी कमी असल्यास प्रति कर्मचारी रु. ९००/- प्रतिदिन दंड आकारला जाईल." | तांत्रिक बिघाड, सर्व्हर डाऊन असणे किंवा उत्सवाच्या गर्दीमुळे हजेरी नोंदवण्यास उशीर झाल्यास, मॅन्युअल हजेरी पत्रक (Manual Muster) किंवा गेट पास ग्राह्य धरण्यात येईल का? | ई-निविदेतील अट क्र.६६ नुसार कार्यवाही करणे अनिवार्य आहे. |
| ०४ | पा.नं. १३ (अट क्र. - ५४ ब) | "कामासाठी नवीन मशिनरी वापरणे बंधनकारक आहे. मशिनरी बंद/नादुरुस्त आढळल्यास प्रति मशिनरी प्रतिदिन रु. १,०००/- दंड केला जाईल." | नादुरुस्त मशिनरीच्या बदल्यात कंत्राटदाराने ४ तासांच्या आत तशीच दुसरी चालू मशिनरी जागेवर उपलब्ध करून दिल्यास हा दंड माफ करण्यात यावा. | **ई-निविदेतील अट क्र.५४ (ब) नुसार निविदाधारक यांनी मशिनरी वापरणे बंधनकारक आहे.** |
| ०५ | पा.नं. ३०, भाग ६ (केमिकल यादी) | "श्री साईबाबा नवीन दर्शन कॉम्प्लेक्सकरिता वार्षिक अंदाजित साहित्य व केमिकलची निश्चित यादी (उदा. १५०० लि. फिनाईल, १००० लि. टॉयलेट क्लिनर)." | ही केमीकल्सची संख्या निश्चित पुरवठा (Fixed Supply) मानली जाईल की प्रत्यक्ष वापराच्या निकषावर (Actual Consumption) याची बिले अदा केली जातील? | ई- निविदेतील पान नं.३० वर नमुद साहीत्य व केमिकल यादी ही अंदाजीत आहे. भावीकांच्या गर्दीच्या प्रमाणानुसार सदर साहीत्य व केमिकलचे प्रमाण कमी जास्त होवू शकते त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी करुन ई-निविदा सादर करावी. ईनिविदेत सादर केलेल्या दरानुसारच बील अदा केले जाईल कोणत्याही प्रकारची वाढीव रक्कम नंतर दिली जाणार नाही अथवा मागणी करता येणार नाही. |

2. Quinteeze यांचे दि.३०/०६/२०२६ रोजीचे ई-मेल व्दारे प्राप्त झालेले मुद्दे व त्यावरील खुलासा खालीलप्रमाणे

| अ.नं. | Clause Title | Queries / Clarification | Justification by Applicant | खुलासा |
|---|---|---|---|---|
| ०१ | निविदेची अंदाजित रक्कम | महाराष्ट्र शासनाच्या खरेदी पुस्तिकेतील कलम 4.4.1.1 नुसार निविदेची अंदाजित वार्षिक किंमत, मासिक किंमत (Zone-wise) तसेच सदर रक्कम GST सहित अथवा GST विरहित आहे का, हे स्पष्ट करण्यात यावे. | निविदाधारकांना वास्तववादी आर्थिक बोली सादर करता यावी व सर्व बोलीदारांमध्ये समान स्पर्धा निर्माण व्हावी. | अट क्र.२२ व BOQ खाली दिलेल्या Note मध्ये नमुद प्रमाणे निविदा भरावी. |
| ०२ | Minimum Wages / VDA | शासनामार्फत किमान वेतन, VDA, EPF, ESIC, बोनस, ग्रॅच्युइटी इत्यादी वैधानिक देयकांमध्ये करार कालावधीत वाढ झाल्यास सदर अतिरिक्त खर्च संस्थानकडून स्वतंत्रपणे अदा करण्यात येईल का, याबाबत स्पष्ट करावे. | वैधानिक वाढीवर कंत्राटदाराचे नियंत्रण नसते. त्यामुळे कायदेशीर देयकांचा भार कंत्राटदारावर पडू नये. | **ई-निविदेतील अट क्र.३३ नुसार संस्थानमार्फत कार्यवाही केली जाईल.** |
| ०३ | BOQ | BOQ तयार करताना कोणत्या शासनाच्या किमान वेतन अधिसूचनेचा आधार घेण्यात आला आहे, याबाबत स्पष्ट करावे. तसेच भविष्यातील वैधानिक वेतनवाढ लागू होईल का, हेही स्पष्ट करावे. | सर्व निविदाधारकांनी एकाच वेतन निकषावर आधारित आर्थिक बोली सादर करणे आवश्यक आहे. | **ई-निविदेतील अट क्र.३३ नुसार संस्थानमार्फत कार्यवाही केली जाईल.** |
| ०४ | नवीन मशिनरी | मागील १२ महिन्यांत खरेदी केलेली, बिलासह उपलब्ध व सुस्थितीतील व्यावसायिक मशिनरी वापरण्यास परवानगी द्यावी. | हाऊसकीपिंग मशिनरीचे उपयुक्त आयुष्य ३ ते ५ वर्षे असते. कार्यक्षम मशिनरी नाकारल्यास अनावश्यक आर्थिक भार पडतो. | निवीदेतील अटी-शर्ती क्र. ५४ (ब)प्रमाणे |
| ०५ | Labour Licence | Form-V उपलब्ध झाल्यानंतर लेबर लायसन्स सादर करण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात यावी अथवा शासकीय प्रक्रियेमुळे झालेल्या विलंबावर दंड आकारू नये. | लेबर लायसन्सची प्रक्रिया संबंधित शासकीय कार्यालयावर अवलंबून असते. | संस्थानकडून Form No-5 दिल्याचे दिनांकापासून पुढील १५ दिवसांत लेबर लायसन्स सादर करणे बंधनकारक राहील. |
| ०६ | Penalty for Short Manpower | अचानक गैरहजेरीच्या परिस्थितीत पर्यायी कर्मचारी उपलब्ध करून देण्यासाठी वाजवी कालावधी द्यावा. दंड केवळ कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळेच आकारण्यात यावा. | काही परिस्थिती कंत्राटदाराच्या नियंत्रणाबाहेर असतात. | ई-निविदेतील अट क्र.६२ नुसार |
| ०७ | Pest Control | विद्यमान एजन्सीकडून Pest Control/Fogging पूर्ण झाल्यानंतर Joint Inspection | पूर्वीच्या एजन्सीच्या त्रुटींची जबाबदारी नवीन एजन्सीवर येऊ नये. | निविदा दस्तऐवजात अशी कोणतीही अट नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Report तयार करून नवीन एजन्सीकडे कामाचा ताबा देण्यात यावा. | | |
| ०८ | Salary Slip | Salary Slip ई-मेल, PDF किंवा WhatsApp द्वारे देण्यास परवानगी द्यावी. छापील प्रत केवळ कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार देण्याची मुभा द्यावी. | डिजिटल इंडिया व पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने कागदाचा वापर कमी होईल. | ई-निविदेतील अट क्र.५४ (अं) नुसार कार्यवाही करावी. |
| ०९ | Service Charge | भारत सरकारच्या लागू मार्गदर्शक सूचनांनुसार Minimum Service Charge बाबत स्पष्टता द्यावी. Zero अथवा Negative Service Charge ग्राह्य धरण्यात येणार नाही का, हे स्पष्ट करावे. | भविष्यातील आर्थिक व कायदेशीर वाद टाळण्यासाठी. | ई-निविदेतील अट क्र.२५ व २९ नुसार सर्व बाबींचा विचार करुन निविदा भरावी. |
| १० | GST | आर्थिक बोलीचे मूल्यांकन GST सहित की GST विरहित करण्यात येणार आहे, याबाबत स्पष्ट करावे. | सर्व बोलीदारांनी एकाच पद्धतीने आर्थिक बोली सादर करणे आवश्यक आहे. | ई-निविदेतील अट क्र.२२ नुसार GST विरहित रक्कम सादर करावयाची आहे. |
| ११ | बंद इमारती | काही इमारती किंवा विभाग वापरात नसल्यास त्या ठिकाणी तैनात केलेल्या मनुष्यबळ व मशिनरीच्या खर्चाची भरपाई कोणत्या पद्धतीने करण्यात येईल? | कंत्राटदाराने केलेल्या गुंतवणुकीचे संरक्षण होणे आवश्यक आहे. | ई-निविदेतील अट क्र.६२ नुसार कार्यवाही केली जाईल. |
| १२ | ESIC / Insurance | ESIC लागू असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र Group Insurance व Workmen Compensation Policy आवश्यक आहे का, याबाबत स्पष्ट करावे. | दुहेरी विमा खर्च टाळण्यासाठी व कायदेशीर स्पष्टता आवश्यक आहे. | ई-निविदेतील अट क्र.१५ नुसार कर्मचा-यांचा १० लाखपर्यंत अपघाती विमा उतरविणे बंधनकारक राहील. |
| १३ | Contract Period | कराराचा कालावधी २२ महिने असल्याने या कालावधीत होणाऱ्या सर्व वैधानिक वाढीचा खर्च संस्थानकडून अदा करण्यात येईल का? | दीर्घकालीन करारात वेतन व इतर वैधानिक वाढ निश्चित असते. | अट क्र.३३ नुसार नुसार कार्यवाही केली जाईल. |
| १४ | Security Deposit | ५% सुरक्षा अनामत रक्कम GST सहित की GST विरहित करार मूल्यावर आकारण्यात येईल, याबाबत स्पष्ट करावे. | सुरक्षा ठेव मोजण्याचा निकष स्पष्ट असणे आवश्यक आहे. | कार्यादेश एकुण रक्कमेवर ५% सुरक्षा अनामत रक्कम GST सहित आकारण्यात येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | Annual Turnover | आवश्यक वार्षिक उलाढाल ही Housekeeping/Gardening सेवांमधील असणे आवश्यक आहे की कंपनीची एकूण उलाढाल ग्राह्य धरली जाईल? | पात्रतेबाबत सर्व निविदाधारकांमध्ये समानता राहावी. | ईनिविदेतील अट क्र.११ नुसार हाऊसकिपीग / गार्डनिंग कामाची असणे आवश्यक आहे. |
| १६ | ISO Certificate s | ISO प्रमाणपत्रांच्या नवीन आवृत्त्या (Latest Version) स्वीकारल्या जातील का, याबाबत स्पष्ट करावे. | अनेक संस्थांकडे सुधारित ISO प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत. | पान नं.०६ वर तांत्रिक मुल्यांकन तक्ता दिलेला आहे. त्यानुसार ISO प्रमाणपत्र आसणे आवश्यक आहे. |
| १७ | Payment Terms | मासिक बिल सादर केल्यानंतर देयक किती दिवसांत अदा करण्यात येईल, याबाबत स्पष्ट करावे. | आर्थिक नियोजन व कर्मचाऱ्यांचे वेळेवर वेतन अदा करण्यासाठी आवश्यक. | ई-निविदेतील अट क्र.५७ नुसार कर्मचा-यांचे वेतन अदा करुन सर्व अनुषंगीक कागदपत्रांची पुर्तता केलेनंतर बील अदा केले जाईल |

उपरोक्त प्रमाणे ई-निवीदेतील अटी व शर्तीबाबत दोन निविदाधारक यांनी मुद्दे उपस्थित केले असून, सदर मुद्दयांबाबत खुलासा निविदाधारकांचे माहितीसाठी संस्थानचे संकेतस्थळावर माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत व ईडीपी विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस मान्यता असावी.

(बाबासाहेब कोते)
प्र.अधिक्षक

(संदिपकुमार भोसले)
प्रशासकीय अधिकारी

(भिमराज दराडे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी